आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार, दिनांक ०६ जून २०२४

ठळक बातम्या

1. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजाभिषेक सोहळयाच्या साडेतीनशेव्या वर्धापनदिनानिमित्त विविध कार्यक्रमांतून मानवंदना.

2. महाविकास आघाडीने राज्यात संविधान बदलाबाबत खोटा प्रचार केल्यानं अपेक्षित यश मिळालं नसल्याचं भाजप प्रदेशाध्यक्ष चन्द्रशेखर बावनकुळे यांचं प्रतिपादन.

3. रशियातील सेंट पिटर्सबर्ग विधानसभा आणि महाराष्ट्र eविधानमंडळ सामंजस्य करारावर स्वाक्ष़्या.

4. नैर्ऋत्य मोसमी पाऊस महाराष्ट्रात दाखल, विदर्भात १० जून पर्यंत वादळी पर्जन्यमानाचा इशारा.

*****

राज्याभिषेक सोहळा

शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेला यंदा ३५० वर्षे झाली आहेत. त्यानिमित्त राज्यभर आज शिवराजाभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात येत आहे. किल्ले रायगडावर आज शिवराजाभिषेक सोहळयाचं खास आयोजन करण्यात आलं होतं. तसंच नवी दिल्लीतल्या राष्ट्रीय कलादालनात विशेष प्रदर्शन भरवण्यात आलं होतं. राज्यपाल रमेश बैस यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना आदरांजली वाहिली असून राज्यातही ठिकठिकाणी शिवराजाभिषेक सोहळा साजरा केला जात आहे. 'महाराष्ट्राचं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा' अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समाजमाध्यमावर महाराजांना मानवंदना दिली आहे. नागपुरातील महाल भागात श्री शिवराजाभिषेक सोहळा समितीच्या वतीनं छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक, शिवतीर्थ इथं शिवचरित्राचं वाचन करण्यात आलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा आज नागपुरात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. नागपूर महावितरण कार्यालयात देखील शिवराजाभिषेक सोहळयाचा कार्यक्रम संपन्न झाला. वाशिम इथं छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाला मराठा सेवा संघाच्या वतीनं अभिवादन करण्यात आलं. यावेळी मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेड यांच्या पदाधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिजाऊ वंदना घेण्यात आली. अमरावती इथल्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात देखील आज शिवराजाभिषेक सोहळा साजरा करण्यात आला.

बैठकी-सत्ता स्थापना

भाजपा अध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं केंद्रीय मंत्री आणि पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांची बैठक सुरू आहे. एनडीएच्या नेत्यांनी काल आपले नेते म्हणून नरेंद्र मोदी यांची एकमतानं निवड केली होती. त्यानंतर ही बैठक होत आहे. गृह मंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह इतर ज्येष्ठ नेते नड्डा यांच्या निवासस्थानी आयोजित बैठकीला उपस्थित आहेत. एनडीएच्या संसदीय पक्षाची बैठक उद्या नवी दिल्ली इथं होणार आहे. एनडीएच्या घटक पक्षांचे नव्यानं निवड झालेले खासदार या बैठकीला उपस्थित राहतील अशी शक्यता आहे. दरम्यान, नव्या रालोआ मंत्रिमंडळात सहभागी होताना संयुक्त जनता दलाने मंत्रिपदासाठी कोणतीही अट घातली नसून बिहारला विशेष दर्जा द्यावा, ही आपली मागणी असल्याचं पक्षाचे ज्येष्ठ नेते के. सी. त्यागी यांनी आज आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. सरकार स्थापनेच्या संदर्भात भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह हे रालोआतल्या घटक पक्षांशी चर्चा करत असल्याचंही त्यागी यांनी सांगितलं.

राहुल गांधी

कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज नवी दिल्ली इथं पत्रकार परिषद घेतली. यावेळी खोट्या एक्सिट पोलमुले शेअर बाजारावर परिणाम झाला असून हा आजवरचा सर्वांत मोठा घोटाळा असल्याचा आरोप त्यांनी केला. चार तारखेला तीस लाख कोटींचं नुकसान झाल्याचं गांधी म्हणाले. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी यावेळी गांधी यांनी केली.

बावनकुळे /फडणवीस

महाविकास आघाडीने राज्यात खोटा प्रचाराचा फुगा फुगवला. संविधान बदलाची खोटी चर्चा पेरली. आदिवासी समजाला भीती दाखवली. त्यामुळेचं आम्हाला अपेक्षित यश मिळू शकलं  नाही, अशी प्रतिक्रिया भाजप प्रदेशाध्यक्ष चन्द्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात दिली. नागपूर विमानतळावर ते पत्रकारांशी बोलत होते. देवेंद्र फडणवीस राज्याचे नेते आहेत. त्यांना निकालानंतर वाईट वाटणे स्वाभाविक आहे. गेल्या दहा वर्षांत फडणवीस यांनी पुढे येऊन जनतेच्या हिताची कामं केली आहेत. तरी जनतेनं भाजपला नाकारलं. त्यामुळे त्यांना वाईट वाटलं आहे.  केंद्रीय नेतृत्वाला फडणवीस यांनी घेतलेला निर्णय अमान्य करण्याची मागणी केल्याची माहिती देखील बावनकुळे यांनी यावेळी दिली. तत्पूर्वी, फडणवीस यांचे आज नागपूर विमानतळावर आगमन होताच भाजप कार्यकर्त्यांतर्फे त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आलं.

सुनील तटकरे

दिल्लीमध्ये एनडीएने बोलावलेल्या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रफुल्ल पटेल आणि आपण उपस्थित राहणार असल्याही माहिती खासदार आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली आहे. मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी आज झालेल्या राष्ट्रवादीच्या कोअर कमिटीच्या बैठकीनंतर ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व ४८ मतदारसंघाच्या बाबत या बैठकीत चर्चा झाली. राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांचा अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास असून सर्व आमदार बैठकीला उपस्थित राहणार आहेत. तसंच १० तारखेला मुंबईत पक्षाचा वर्धापनदिन षण्मुखानंद सभागृहात साजरा करण्यात येणार आहे, असं तटकरे यांनी सांगितलं. सोबतच राज्यात मंत्रिमंडळ विस्ताराबद्दल कसलीही चर्चा या बैठकीत झाली नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

जयंत पाटील

आज राष्ट्रवादी काँग्रेस- शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व खासदार पक्षप्रमुख शरद पवार यांची भेट घेण्यासाठी मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात पोहोचले. या पक्षाचे 8 खासदार लोकसभेत निवडून आले आहेत. आपल्या पक्षाने 10 जागांवर निवडणूक लढवली आणि 8 खासदार निवडून आले, असं सांगत 9 जून रोजी मुंबईत राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक होणार असून 10 जून रोजी अहमदनगरमध्ये पक्षाच्या स्थापना दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिली. आमचे सर्व निवडून आलेले खासदार शेतकऱ्यांचे प्रश्न, महागाई असे मुद्दे सभागृहात पुढे आणतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीचे निकाल पाहता विधानसभा निवडणुकीत आणखी मोठा विजय मिळेल, असा विश्वास वाटतो, असंही ते म्हणाले.

विजय वडेट्टीवार

राज्यात नॅनो डीएपी, नॅनो युरीया, मेटाल्डीहाईड किटकनाशकाची तिप्पट दराने खरेदी सुरू असल्याची माहिती प्राप्त झाली असून हा कृषी आयुक्तालयाचा मोठा घोटाळा असल्याचा आरोप विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. याबाबत विधानसभेत आवाज उठवणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ नॅनो डीएपी आणि नॅनो युरीया खते तयार करत नाही. त्यामुळे ही खते इफको कंपनीकडून कृषी आयुक्तालय थेट खरेदी करून शेतकऱ्यांना त्याचं वाटप करतं. तरीही कृषी आयुक्तालयाने हा निधी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाला वितरीत

केला असून यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे या प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही वडेट्टीवार यांनी केली आहे.

<u>महावितरण स्थापना दिन</u>

नागपूर महावितरणचा 19 वा स्थापना दिन महावितरणच्या विविध कार्यालयांत उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रादेशिक संचालक सुहास रंगारी आणि मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केक कापून उपस्थित कर्मचा-यांना स्थापनादिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्युत भवनच्या प्रांगणात रंगारी आणि दोडके यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षण आणि वीज बचतीचा संदेश देणारे रंगीत फुगे आकाशात सोडण्यात आले.

<u>महाराष्ट्र विधानमंडळ सामंजस्य करार</u>

रशियन फेडरेशनच्या निमंत्रणानुसार महाराष्ट्र विधानमंडळाचे उच्चस्तरीय शिष्टमंडळ ५ ते ९ जून दरम्यान रशियातील सेंट पिटर्सबर्गच्या अभ्यासदौऱ्यावर असून आज दोन्ही विधानमंडळांमधील सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. 'अनेक वर्षांपासूनच्या भारत-रशिया मैत्रीसंबंधांच्या दृष्टीने तसेच मुंबई-सेंट पिटर्सबर्ग सिस्टर सिटीजच्या वाटचालीतील हा सामंजस्य करार म्हणजे मानाचा तुरा ठरणार आहे. हा सामंजस्य करार ऐतिहासिक आणि भविष्यकालीन दृढ संबंधांची ग्वाही देणारा दिशादर्शक असा आहे', अशी भावना यावेळी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष आणि अभ्यासदौरा शिष्टमंडळाचे नेते **ॲ**ड. राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केली. या सामंजस्य करारावर विधानसभा अध्यक्ष **ॲ**ड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि सेंट पिटर्सबर्ग विधानसभेचे अध्यक्ष अलेक्झँडर बेलस्की यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

<u>मराठी चित्रपट प्रवेशिका</u>

५८, ५९ आणि ६० व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांच्या प्रवेशिका सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता १४ जून २०२४ पर्यंत प्रवेशिका सादर करता येणार आहेत. त्यामुळे निर्मात्यांनी अनुक्रमे सन २०२०, २०२१ आणि २०२२ या कॅलेंडर वर्षात सेन्सॉर प्राप्त झालेल्या मराठी चित्रपटांच्या प्रवेशिका दिलेल्या विहित मुदतीत सादर करण्याचे आवाहन महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी केलं आहे.

पाणीसाठा राज्य

राज्यभरातल्या धरणांमध्ये अत्यल्प पाणीसाठा शिल्लक आहे. नागपूर इथल्या जलाशय आणि प्रकल्पांमध्ये सर्वाधिक सरासरी ३७ पूर्णांक ६४ टक्के तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पाणीप्रकल्पांमध्ये सर्वात कमी सरासरी केवळ ८ पूर्णांक ३३ टक्के इतकाच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत छत्रपती संभाजीनगरमध्ये ही सरासरी ३३ पूर्णांक ५५ टक्के इतकी होती.

नैऋत्य मोसमी पाऊस

नैऋत्य मोसमी पावसाच्या पुढच्या वाटचालीसाठी परिस्थिती अनुकूल असून, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीत मान्सून दाखल झाला आहे. सिंधुदुर्ग इथं कालपासून तर रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या दोन-तीन दिवसांपासून पाऊस सुरू आहे. गेल्या २४ तासांत लांजा इथं सर्वाधिक १८ पूर्णांक ८० मिलिमीटर पावसाची, तर दापोलीत १६ पूर्णांक ६२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. रत्नागिरी तालुक्यात आजही सकाळी दहा वाजल्यानंतर काही वेळ पावसाची संततधार सुरू होती.

हवामान

विदर्भात गेल्या 24 तासात भंडारा इथं सर्वाधिक 41 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. याशिवाय अमरावती, नागपूर, गोंदिया, गडचिरोली या ठिकाणी कमाल तापमान 40° सेल्सियसच्या घरात आहे, तर चंद्रपूर, यवतमाळ, अकोला, वाशिम या ठिकाणी तापमान 38 ते 39 अंशाच्या दरम्यान आहे. बुलढाणा इथं 35.5 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. आगामी 10 जून पर्यंत विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता आहे. यादरम्यान विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा आणि हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. आज दुपारपासून नागपूर देखील वादळी पर्जन्यमान अनुभवत आहे.

******